ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स, व्ही.आय.पी.रोड, नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक ३०० • शुक्रवार दि.२८ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## चार संशयीत पोलीसांच्या ताब्यात
# जुन्या वादातून तरुणाचा खून

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील एकतानगर येथे गुरुवारी रात्री जुन्या वादातून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या एका युवकाचा निर्घुणपणे खून केल्याची घटना घडली आहे. मयत युवकाला वाचविण्यासाठी आलेल्या लहान भाऊ व आई ह्या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्या आहेत.

एकतानगर मधील आकाश मिलिंद दवणे (वय ३२) या युवकावर अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या विरुद्ध हद्दपारीचा प्रस्तावही प्रशासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. आकाश दवणे व सावते गटाच्या काही तरुणांमध्ये अनेक दिवसांपासून वाद चालू होता. दवणे व सावते यांच्यात किरकोळ भांडणे होत असल्याने पोलीसांनी दोन्ही गटाला भाग्यनगर पोलीस ठाण्यात बोलवून पोलीस निरिक्षक संतोष तांबे यांनी तंबी देवून शांत राहण्यास सांगितले होते. गुरुवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास एकतानगर येथील विहाराच्या पाठीमागे आकाश दवणे याचा काही तरुणांसोबत



वाद झाला. वादाचे रुपांतर हाणामारीच्या पर्यावसनात घडले. आकाश दवणे याच्यासोबत तरुणांची सुरु असलेली हाणामारी सोडविण्यासाठी त्याचा लहान भाऊ महेश दवणे व आई सविता दवणे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी हाणामारी रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु आरोपींनी आकाश दवणे व त्याचा भाऊ महेश याच्यावर खंजरने हल्ला केला. या हल्ल्यात आकाशचा जागीच मृत्यू झाला. तसेच महेश हा गंभीर जखमी झाला असून त्याची आई सविता यांनाही दुखापत झाली. जोरदार आरडाओरड सुरु झाल्यानंतर आरोपी अंधाराचा फायदा घेवून पळून गेले. घटनेची माहिती समजताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने, पोलीस निरिक्षक संतोष तांबे, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन प्रेत शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले. तसेच जखमींनाही उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेतील चार संशयीत आरोपींना पोलीसांनी अटक केली.

## मनोज जरांगे पाटील यांचे उद्यापासून उपोषण

अंतरवाली सराटी : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आंदोलनाची हाक दिली असून, उद्यापासून अंतरवाली सराटीत बेमुदत उपोषण सुरू करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. ५८ लाख मराठा-कुणबी नोंदी सापडल्या असून, त्या नोंदींच्या प्रमाणपत्रांना वैधता द्यावी, ही त्यांची प्रमुख मागणी आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट करत मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.



मराठा आरक्षणासाठी मी उपोषणावर ठाम आहे. मरेस्तोवर उठणार नाही. ५८ लाख नोंदींची प्रमाणपत्रे मिळालीच पाहिजेत. त्याशिवाय आंदोलन थांबणार नाही. हे आंदोलन टोकाचे होणार आहे, असा इशारा जरांगे यांनी दिला.मराठा समाजाने घरात न बसता अंतरवाली सराटीत एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले. ज्यांनी प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत, ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत मात्र प्रमाणपत्र मिळालेले नाही, तसेच निवड होऊनही नियुक्त्या मिळालेल्या उमेदवारांनी अंतरवालीत येऊन अर्ज द्यावेत, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, सरकारकडून फोन आल्याचे सांगत जरांगे म्हणाले की, अंमलबजावणी द्या, केवळ चर्चा नको. आता आझाद मैदान किंवा अन्य ठिकाणी न बसता थेट वर्षा बंगल्यावर आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना त्यांनी मराठा पान ४ वर

## चीनमध्ये भूकंप तर नेपाळला पुन्हा पुराचा धोका
### त्रिशुली नदीची पाणीपातळी वाढण्याची भीती;नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

नवी दिल्ली:चीनच्या सिचुआन प्रांतात गुरुवारी ५.१ तीव्रतेचा भूकँप झाल्यानंतर नेपाळमध्ये पुन्हा पुराचा धोका निर्माण झाला आहे. भूकँपानंतर तिबेटच्या बाजूला असलेले एक धरण पुन्हा फुटल्याची माहिती नेपाळ पोलिसांना मिळाली असून, त्यातून पाण्याचा प्रवाह वेगाने खाली येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे त्रिशुली नदीची पाणीपातळी अचानक वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे.

चायना अर्थक्वेक नेटवर्क्स सेंटरच्या माहितीनुसार, सिचुआन प्रांताच्या नैऋत्य भागातील लाँगचांग शहरात या भूकँपाची नोंद झाली. चिनी प्रसारमाध्यम सीजीटीएननेही भूकँपाची माहिती दिली आहे.भूकँपानंतर नेपाळ पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला. तिबेटच्या बाजूला असलेले धरण पुन्हा फुटल्याची माहिती मिळाल्याचे पोलिसांनी एक्सवरून सांगितले. संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा कर्मचारी, मदत व बचाव पथके तसेच नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि तातडीने सुरक्षितस्थळी जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील इतरांनाही धोक्याची माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.पाण्याचा प्रवाह वेगाने खाली आल्यास त्रिशुली नदीच्या पाणीपातळीत अचानक वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या आणि धोकादायक भागातील नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरू केली आहे. नेपाळच्या प्रतिनिधी गृहातील विरोधी पक्षनेते भीष्म राज आंगदेम्बे यांनी त्रिशुली येथे पत्रकारांशी बोलताना बचाव कार्याची पान ४ वर




नांदेड जिल्हा पोलीस प्रशासन व शहर वाहतूक शाखेच्यावतीने ''सडक सुरक्षा रक्षाबंधन'' हा उपक्रम जिल्हा पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मारुती मुंडे, उपनिरीक्षक जसपालसिंघ कोटतिर्थवाले यांच्या उपस्थितीत शहरातील वजिराबाद चौरस्ता येथे राबविण्यात आले. यावेळी वाहनधारकांना राखी बांधुन सुरक्षेचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी वाहतूक शाखेचे कर्मचारी उपस्थित होते.

## परिक्रमा यात्रा आटोपून मातृतीर्थ कुंडात आंघोळीसाठी गेलेल्या भाविकाचा बुडून मृत्यू

माहूर/प्रतिनिधी-नारळी पौर्णिमेनिमित्त माहूरगडावर सुरू असलेल्या परिक्रमा यात्रेसाठी लाखो भाविक दाखल झाले असतानाच, मातृतीर्थ कुंडात पोहण्यासाठी उतरलेल्या २८ वर्षीय भाविकाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (दि.२८) सकाळी साडेआठच्या सुमारास घडली. अनिकेत वाल्मीक तुरक (वय २८, रा. गायवळ, ता. कारंजा लाड, जि. वाशिम) असे मृत भाविकाचे नाव आहे. या घटनेमुळे यात्रास्थळी एकच खळबळ उडाली.

अनिकेत तुरक हे आपली बहीण व गावातील अन्य भाविकांसह दरवर्षीप्रमाणे यंदाही भाड्याच्या क्रूझर वाहनाने बुधवारी (दि.२७) सायंकाळी माहूरगडावर आले होते. माहूर शहरातील पार्किंगमध्ये वाहन उभे करून त्यांनी श्री दत्तशिखर संस्थानसह यात्रेतील विविध २६ ठिकाणांची पायी परिक्रमा पूर्ण केली. परिक्रमा आटोपल्यानंतर इतर भाविक गडावरून खाली येत असताना अनिकेत हा आंघोळ करण्यासाठी मातृतीर्थ कुंडाकडे गेला.पोहण्याच्या उद्देशाने त्याने कुंडातील पाण्यात उडी मारली. यावेळी तेथे तैनात असलेल्या जीवरक्षक दलाच्या जवानांनी तत्काळ त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाण्यातून बाहेर येत असताना त्याचा दम लागल्याने तो काठावरील पायऱ्यांपासून सुमारे दहा फूट अंतरावर पाण्यात बुडाला.



जीवरक्षक जवानांनी तातडीने पाण्यात उडी घेत त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; मात्र कुंडातील खोल गाळात तो रुतल्याने त्याचा ठावठिकाणा लागला नाही.घटनेची माहिती मिळताच तहसीलदार अभिजीत जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी किरण कुमार भोंडवे, नगराध्यक्ष फिरोज दोसानी, मुख्याधिकारी विवेक कांदे, पोलिस निरीक्षक देविदास चोपडे, नायब तहसीलदार कैलास जेठे, तलाठी चंद्रकांत बाबर, विश्वस्त संजय काण्णव यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. सकाळी सुमारे ९ वाजता सुरू झालेली शोधमोहीम दुपारी तीन वाजेपर्यंत सुरू होती. अखेर अथक प्रयत्नांनंतर दुपारी तीनच्या सुमारास अनिकेत तुरक यांचा मृतदेह शोध पथकाच्या हाती लागला. मृतदेह बाहेर काढून पुढील कार्यवाहीसाठी माहूर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. यात्रेच्या काळात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे अनिकेत यांच्या कुटुंबीयांसह गावातील भाविकांवर शोककळा पसरली आहे.

## नेपाळच्या पुरात अडकलेले राज्यातील ३७ भाविक काठमांडूकडे सुखरुप

मुंबई/प्रतिनिधी-कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण करून परतीच्या प्रवासात तिबेटमधील सागा येथे अडकलेल्या महाराष्ट्रातील ३७ भाविकांचा काठमांडूकडे सुरक्षित परतीचा प्रवास आज, २८ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता सुरू झाला. न्यालम चेक पोस्टमार्गे हे सर्व भाविक काठमांडूकडे रवाना झाले आहेत.

ठाणे, पुणे, अलिबाग, रायगड आणि डोंबिवली परिसरातील हे भाविक जय गिरनारी ट्रस्ट, अलिबागचे प्रमोद केणे यांच्यासोबत कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेले होते. परतीच्या प्रवासात सागा येथे अडकल्याने त्यांच्यासमोर काठमांडू गाठण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. भाविकांचे काठमांडूहून परतीचे विमान २९ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता असल्याने त्यांना वेळेत काठमांडू पोहोचणे आवश्यक होते. या समूहातील नितीन शिर्के आणि राकेश जितेकर यांनी सागा येथे अडकल्याची माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचवली. माहिती मिळताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी तातडीने पुढाकार घेत संबंधित यंत्रणांना मदतीच्या सूचना दिल्या.यानंतर महाराष्ट्र शासनाने भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाशी तातडीने संपर्क साधून आवश्यक समन्वय केला. परराष्ट्र मंत्रालयानेही तत्परतेने मदत व सहकार्य केल्याने भाविकांचा काठमांडूकडे सुरक्षित प्रवास सुरू झाला. संकटाच्या काळात तातडीने मदत मिळाल्याबद्दल सर्व ३७ भाविकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे आभार मानले.

## गोकुंदा विश्रामगृह प्रकरण चिघळले;तक्रार मागे घेण्यासाठी आदिवासी महिलेवर दबावतंत्र
### पीडितेने दिला आत्मदहनाचा इशारा



किनवट/प्रतिनिधी-गोकुंदा येथील विश्रामगृहातील प्रकरण आता व्यापक होऊ लागले आहे. पोलीस निरीक्षकांविरुद्धची तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकणाऱ्यांपासून जीविताला धोका होण्याची भीती व्यक्त करीत, त्यांच्या विरुद्ध २७ ऑगस्ट रोजी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करुन कारवाई करण्याची मागणी केली आहे. या सर्वांचे मोबाईल सीडीआर. तपासणीसह त्यांच्यावर कारवाई न केल्यास १ सप्टेंबर पासून आमरण उपोषण आणि २ सप्टेंबर रोजी शेकडो समाजबांधवांच्या उपस्थितीत आत्मदहन करण्याचा संतप्त इशारा पिडीतेने दिला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

२१ ऑगस्ट रोजी आदिवासी पिडीत महिलेची तक्रार किनवट पोलीस ठाण्यात दाखल करून न घेता अपमानास्पद वागणूक देवून परत पाठविल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षकांनी आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न केल्याचा मुद्दा त्यात नमूद आहे. तक्रार मागे घेण्यासाठी कोणी त्या पिडीतेच्या घरी संपर्क करुन तर कोणी मोबाईलवरुन मॅसेज पाठवून, हॉटेलमध्ये नेऊन तक्रार परत घेण्यासाठी, त्याला जसे जमेल तसे दबावतंत्राचा वापर केला, त्या सर्वांची नावे महाराष्ट्र राज्याच्या महिला आयोग, जिल्हा पोलीस प्रमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी आणि अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे अध्यक्ष प्रा.विजय खुपसे यांच्याकडे त्या असह्य पिडीतेने न्याय मागण्यासाठी धाव घेतल्याचे समजते. २६ ऑगस्ट पासून दबावतंत्र वापरत आहेत. पोलीस निरीक्षकांविषयी 'काहीही म्हणणे नाही' असा व्हिडीओ तयार कर. त्या संबंधिचा लेखी संदेश (मॅसेज) एकाने शासकीय विश्रामगृह गोकुंदाचे व्यवस्थापक यांच्या मोबाईलवर २४ ऑगस्ट रोजी दुपारी १.३४ व १.४१ मिनीटाला पाठविला आहे. या सर्वांपासून पिडीतेच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची भीती तक्रारीत व्यक्त केली आहे. याच मुद्यावरुन पिडीत महिला १ सप्टेंबर रोजी सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषणास बसणार आहे. या उपरही मला न्याय मिळाला नाही तर तिथेच शेकडो समाज बांधवाच्या उपस्थितीत २ सप्टेंबर रोजी आत्मदहन करण्याचा गर्भीत इशारा पिडीत महिलेने निवेदनात दिला आहे. पान ४ वर

## नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी-शेतातील नापिकीला कंटाळून एका शेतकऱ्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

शुद्धोधन नागोराव गुंडेकर (वय ४६) रा.फुलेनगर, भोकर या शेतकऱ्याने शेतीसाठी बँकेकडून कर्ज घेतले होते. शेतातील सततच्या नापिकीमुळे बँकेच्या कर्जाची परतफेड करता आली नाही. बँकेचे कर्ज कसे फेडायचे या चिंतेतून शुद्धोधन गुंडेकर यांनी दि.२७ ऑगस्ट रोजी राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केली. या प्रकरणी भोकर पोलीस ठाण्यात अकस्मीक मृत्यू म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# परीक्षांवरील विश्वास उडाला तर अराजक?

**स्पर्धा परीक्षा ही केवळ नोकरी मिळविण्याची प्रक्रिया नसते; ती लाखो तरुणांच्या आयुष्याची दिशा ठरविणारी व्यवस्था असते. वर्षानुवर्षे अभ्यास करून, आर्थिक अडचणींवर मात करून आणि अनेकदा आपल्या तारुण्याची महत्त्वाची वर्षे पणाला लावून विद्यार्थी या परीक्षांना सामोरे जातात. त्यामुळे या परीक्षांच्या प्रक्रियेवरचा विश्वास हा त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. मात्र, देशात गेल्या काही दिवसांपासून स्पर्धा परीक्षा असोत किंवा सरकारी नोकरीसाठीच्या परीक्षा असोत, पेपरफुटी आणि गैरप्रकारांच्या एकापाठोपाठ एक घटना समोर येत असल्याने हा विश्वास डळमळीत होत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटीचे प्रकरण त्याच मालिकेतील गंभीर दुवा ठरले आहे.या प्रकरणात सुरुवातीला काही विद्यार्थ्यांनी पेपर फुटल्याचा आरोप केला. तेव्हा हा पेपर फुटणे शक्यच नाही, असा विश्वास आयोगाकडून व्यक्त करण्यात आला. मात्र, विद्यार्थ्यांनी पुरावे सादर केले. आरोप मागे घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांवर दबाव आणला गेल्याचेही आरोप झाले. तरीही एका विद्यार्थ्याने दबावाला बळी न पडता आणखी पुरावे समोर आणले. त्यानंतर राज्य शासनाने चौकशी केल्यावर या प्रकरणात संशयास्पद बाबी असल्याचे उघड झाले. या संपूर्ण घटनाक्रमातून एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो.परीक्षेच्या प्रक्रियेतील त्रुटींपेक्षा त्या त्रुटी निदर्शनास आणून देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आवाजाकडे सुरुवातीला संशयाने का पाहिले जाते? एमपीएससी ही स्वायत्त संस्था आहे, असे सांगितले जाते. स्वायत्तता ही तिच्या विश्वासार्हतेची पहिली अट आहे. परंतु आयोगातील कर्मचाऱ्यांची भरती राज्य शासनाच्या माध्यमातून होते आणि आयोगाच्या अध्यक्षांच्या नियुक्तीची प्रक्रियाही शासनाच्या अखत्यारीत असते. त्यामुळे स्वायत्ततेबरोबरच उत्तरदायित्वाचाही प्रश्न उपस्थित होतो. जर प्रशासकीय अधिकारी आपल्या पदाच्या जबाबदारीपेक्षा अध्यक्षांच्या खुर्चीशी असलेल्या जवळिकीला अधिक महत्त्व देत असतील, तर परीक्षा यंत्रणेची विश्वासार्हता टिकणार कशी? स्वायत्त संस्थेचा अर्थ शासनापासून तुटलेली संस्था असा नाही; पण तिच्या निर्णयप्रक्रियेत कोणताही राजकीय किंवा प्रशासकीय हस्तक्षेप होऊ नये, एवढी अपेक्षा निश्चितच आहे.१९९९ च्या एमपीएससी पेपरफुटीच्या घटनेनंतर आयोगाच्या परीक्षा पद्धतीत अनेक सुधारणा करण्यात आल्या. कालांतराने एमपीएससीने आपली विश्वासार्हता निर्माण केली. तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, पोलीस निरीक्षक यांसारख्या महत्त्वाच्या पदांसाठी परीक्षा घेणाऱ्या या आयोगावर विद्यार्थ्यांचा विश्वास वाढत गेला. इतकाच नव्हे, तर इतर भरती प्रक्रियेतील घोटाळे आणि गैरप्रकार समोर आल्यानंतर कारकूनासारख्या पदांची भरतीदेखील एमपीएससीमार्फतच व्हावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. म्हणजेच विद्यार्थ्यांनी आयोगाकडे केवळ परीक्षा घेणारी संस्था म्हणून नव्हे, तर निष्पक्षतेची हमी देणारी संस्था म्हणून पाहिले.आज नेमका हाच विश्वास धोक्यात आला आहे.परीक्षेतील गैरप्रकाराचा सर्वांत मोठा फटका आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बसतो. कारण त्यांच्या हातात ना मोठी आर्थिक ताकद असते, ना प्रभावशाली संपर्क. त्यांच्याकडे असते ती केवळ मेहनत आणि प्रामाणिकपणे परीक्षा देण्याची आशा. जर पैसा, ओळख किंवा राजकीय संपर्क असलेल्या व्यक्तींना आधीच प्रश्नपत्रिका उपलब्ध होत असेल, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याने व्यवस्था आपल्या बाजूने आहे, असा विश्वास ठेवायचा तरी कशाच्या आधारावर? दुर्दैवाने या प्रकरणावरही राजकारण सुरू झाले आहे. अटक झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्या राजकीय मंडळींशी संबंध आहेत, यावर आरोप-प्रत्यारोप होत आहेत. पण गेल्या दशकभरात सत्तेवर कोण होते, कोणाच्या काळात या नियुक्त्या झाल्या आणि प्रशासनावर नियंत्रण कोणाचे होते, याचे उत्तर जनतेला माहीत आहे. त्यामुळे दोषाचे खापर एकमेकांवर फोडण्यापेक्षा प्रशासनावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात शासन अपयशी ठरले का, याचे आत्मपरीक्षण सत्ताधाऱ्यांनी करणे आवश्यक आहे.या प्रकरणात केवळ चार-पाच अधिकाऱ्यांना अटक करून प्रश्न संपणार नाही. प्रश्नपत्रिका फुटण्यापासून ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेपर्यंत कोणकोणत्या पातळ्यांवर संगनमत झाले, त्यामागे आर्थिक व्यवहार किती झाले, कोणाला त्याचा लाभ मिळाला आणि या संपूर्ण यंत्रणेच्या मागे असलेले खरे सूत्रधार कोण आहेत, याचा शोध घेतला पाहिजे. परीक्षा घोटाळ्यांतील --झारीतील शुक्राचार्य-- समाजासमोर आणणे ही शासनाची जबाबदारी आहे.तरुणाईचा व्यवस्थेवरील विश्वास हा लोकशाहीच्या भवितव्याशी जोडलेला आहे.आज परीक्षेवरचा विश्वास उडाला, उद्या नोकरीच्या प्रक्रियेवरचा उडेल आणि परवा संपूर्ण व्यवस्थाच आपल्या विरोधात आहे, अशी भावना तरुणांच्या मनात निर्माण होईल. ही भावना केवळ निराशा निर्माण करणार नाही, तर असंतोष आणि अराजकतेलाही खतपाणी घालू शकते.म्हणूनच परीक्षा निष्पक्ष, पारदर्शक आणि सुरक्षित होणे हा विद्यार्थ्यांवर उपकार नसून त्यांचा अधिकार आहे.शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करावी, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे भविष्यात अशा घटना घडणारच नाहीत, अशी विश्वासार्ह यंत्रणा उभी करावी. कारण प्रश्न एका परीक्षेचा नाही; प्रश्न आहे लाखो तरुणांच्या भविष्याचा. आणि तरुणाईचा व्यवस्थेवरील विश्वास एकदा तुटला, तर तो पुन्हा जोडणे कोणत्याही शासनासाठी सोपे राहणार नाही.**

# राखीच्या धाग्यापलीकडचे बहिण-भावाचे नाते



डॉ.राजेंद्र बगाटे

रक्षाबंधन हा बहिण-भावाच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा, विश्वास आणि आपुलकी व्यक्त करण्याचा दिवस आहे. यंदा २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन साजरे होत आहे. या दिवसाकडे धार्मिक परंपरा किंवा कर्मकांडाच्या चौकटीतून न पाहता, मानवी नात्यांच्या भावविश्वातून पाहिले तर त्याचे महत्त्व अधिक व्यापकपणे जाणवते. बहिण आणि भाऊ हे नाते जन्मतः मिळते; परंतु त्यातील प्रेम, विश्वास आणि आपलेपणा आयुष्यभर जपावा लागतो. बालपणीच्या निरागस आठवणींपासून ते प्रौढ आयुष्यातील जबाबदाऱ्यांपर्यंत हे नाते अनेक अनुभवांतून समृद्ध होत जाते. कधी त्यात खोडकरपणा असतो, कधी भांडणे असतात, कधी रुसवे-फुगवे असतात, तर कधी कोणत्याही शब्दांशिवाय एकमेकांना समजून घेणारी विलक्षण जवळीक असते. म्हणूनच बहिण-भावाचे नाते हे केवळ रक्तसंबंध नसून भावनिक सोबतीचे आणि आयुष्यभर टिकणाऱ्या विश्वासाचे नाते आहे.

बहिण-भावाच्या नात्याची सुरुवात बहुतेकदा बालपणाच्या अंगणात होते. एकाच घरात वाढताना दोघांच्या आयुष्यातील असंख्य क्षण एकमेकांशी जोडलेले असतात. खेळताना झालेले भांडण, खाऊसाठी केलेली धावपळ, शाळेत जाण्याची लगबग, गृहपाठ टाळण्यासाठी केलेली कारणे, पालकांकडून मिळालेली कौतुकाची थाप आणि कधी झालेली रागाची बोलणी या सर्व आठवणी भावंडांच्या मनात साठत जातात. बालपणी एखादी छोटीशी वस्तू मिळाली नाही म्हणून झालेले भांडण त्या क्षणी मोठे वाटते; परंतु काही वेळाने तेच दोघे पुन्हा एकत्र खेळू लागतात. या छोट्या घटनांमधून नात्याचा एक महत्त्वाचा गुण दिसून येतो. मनात राग असला तरी मनात दुरावा कायम राहत नाही. बालपणातील हे सहज प्रेम पुढे आयुष्याच्या अनेक वळणांवर भावंडांना एकमेकांशी जोडून ठेवते. बहिण-भावाच्या नात्यातील सर्वांत सुंदर गोष्ट म्हणजे त्यातील सहजता. या नात्यात स्वतःला वेगळे दाखवण्याची गरज नसते. आपली चूक, आपला राग, आपले दुःख, आपला आनंद किंवा आपली चिंता मनमोकळेपणाने व्यक्त करता येते. बाहेरच्या जगात प्रत्येक व्यक्तीला आपली प्रतिमा जपावी लागते; परंतु भावंडांसमोर ती प्रतिमा बाजूला ठेवून मनातील खरी भावना व्यक्त करता येते. बहीण भावाला त्याच्या चुका थेट सांगू शकते आणि भाऊही बहिणीला तिच्या निर्णयांबद्दल प्रामाणिक सल्ला देऊ शकतो. या मोकळेपणामुळे नाते अधिक घट्ट होते. अनेकदा आयुष्यातील एखाद्या कठीण प्रसंगी मित्रांपेक्षा आधी आठवण येते ती भावंडांची. कारण या नात्यात मदतीपूर्वीच विश्वास असतो. बालपण मागे पडले की भावंडांच्या आयुष्यात बदल सुरू होतात. शिक्षणासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाणे, नोकरीसाठी शहर बदलणे, विवाहानंतर स्वतंत्र कुटुंब निर्माण करणे किंवा परदेशात स्थायिक होणे यामुळे एकत्र राहण्याचे दिवस संपतात. पूर्वी दररोज होणारा संवाद आता आठवड्यातून किंवा महिन्यातून एकदा होऊ शकतो. एकाच घरात वाढलेली भावंडे कधी कधी हजारो किलोमीटर अंतरावर राहू लागतात. मात्र भौगोलिक अंतर वाढले म्हणून भावनिक अंतर वाढायलाच हवे असे नाही. उलट, दूर गेल्यावर एकमेकांची आठवण अधिक तीव्र होते. बालपणीच्या आठवणी, कुटुंबातील प्रसंग आणि एकत्र घालवलेला काळ या आठवणी भावंडांना मनाने जोडून ठेवतात.आजच्या वेगवान जीवनात प्रत्येक व्यक्ती आपल्या कामाच्या आणि वैयक्तिक जबाबदाऱ्यांच्या व्यापात अडकलेली आहे. अशा परिस्थितीत नाती जपण्यासाठी जाणीवपूर्वक वेळ देणे आवश्यक झाले आहे. बहिण-भावाच्या नात्यासाठी महागड्या भेटवस्तूंची गरज नाही. कधी अचानक केलेला दूरध्वनी, मनापासून विचारलेली विचारपूस, एखादा जुना प्रसंग आठवून केलेली गंमत किंवा संकटाच्या वेळी दिलेला धीर हे अधिक मौल्यवान असते. तू कसा आहेस? किंवा तुला काही मदत हवी आहे का? एवढे साधे शब्दही नात्याला आधार देतात. नात्याची किंमत भेटवस्तूच्या किमतीने ठरत नाही; ती एकमेकांना दिलेल्या वेळेने, समजून घेण्याच्या वृत्तीने आणि कठीण प्रसंगी दिलेल्या साथीने ठरते.

बहिण-भावाचे नाते आजच्या काळात समानतेच्या नव्या अर्थाने समजून घेण्याची गरज आहे. पूर्वी भावाची भूमिका केवळ बहिणीचे संरक्षण करणारा अशी मांडली जात असे. आज मात्र या नात्याचा अर्थ त्यापेक्षा व्यापक झाला आहे. बहीणही भावाच्या आयुष्यात तितकीच आधार देणारी व्यक्ती असते. भावाला अडचण आली तर बहीण त्याच्या पाठीशी उभी राहते आणि बहिणीसमोर संकट आले तर भाऊ तिच्यासोबत राहतो. ही साथ एकतर्फी नसून परस्परांची असली पाहिजे. प्रेमामध्ये अधिकार असू शकतो; परंतु नियंत्रण नसावे. काळजी असावी; परंतु बंधने नसावीत. सल्ला असावा; परंतु निर्णय लादण्याची वृत्ती नसावी. या समतोलातूनच आधुनिक बहिण-भावाचे नाते अधिक परिपक्व होऊ शकते.विशेषतः बहिणीच्या शिक्षण, करिअर आणि स्वावलंबनाच्या वाटचालीत भावाची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. बहिणीने काय शिकावे, कोणते काम करावे, कुठे राहावे किंवा कोणते निर्णय घ्यावेत यावर अधिकार गाजवण्याऐवजी तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे ही खरी साथ आहे. तिच्या यशाचा आनंद स्वतःच्या यशासारखा मानणे आणि तिच्या अपयशाच्या वेळी तिला खंबीरपणे उभे करणे हे भावाच्या प्रेमाचे अधिक सुंदर रूप आहे. त्याचप्रमाणे भावाच्या आयुष्यातील संघर्ष, आर्थिक अडचणी, करिअरमधील चढ-उतार किंवा भावनिक ताण समजून घेऊन त्याला दोष न देता ऐकून घेणे ही बहिणीचीही महत्त्वाची भूमिका आहे. दोघांनीही एकमेकांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारले पाहिजे.

बहिण-भावाच्या नात्यात संवादाला विशेष महत्त्व आहे. अनेक गैरसमज संवादाच्या अभावामुळे निर्माण होतात. तो स्वतःहून समजून घेईल किंवा ती माझ्या मनातील भावना ओळखेल असे गृहीत धरल्याने कधी कधी मनात अंतर वाढते. त्याऐवजी आपल्याला काय वाटते हे स्पष्टपणे सांगणे, समोरच्याचे म्हणणे शांतपणे ऐकणे आणि मतभेद झाले तरी नाते तोडण्याऐवजी संवाद कायम ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक भावंडाची जीवनशैली, विचारसरणी आणि निर्णय घेण्याची पद्धत वेगळी असू शकते. मतभिन्नता म्हणजे नात्यातील तुटलेपणा नव्हे. परस्परांच्या वेगळेपणाचा स्वीकार करणे हेच प्रगल्भ नात्याचे लक्षण आहे.विवाहानंतर बहिणीचे आयुष्य अनेक बाबतींत बदलते. ती नव्या कुटुंबात प्रवेश करते, नवीन जबाबदाऱ्या स्वीकारते आणि अनेकदा वेगळ्या शहरात राहू लागते. अशा वेळी माहेरच्या भावंडांशी असलेले नाते तिच्यासाठी भावनिक आधार ठरू शकते. मात्र हा आधार तिच्या वैयक्तिक आयुष्यात अनावश्यक हस्तक्षेप करणारा नसावा. बहिणीच्या जीवनातील निर्णयांचा सन्मान करणे आणि तिच्या गरजेच्या वेळी तिच्या पाठीशी उभे राहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे विवाहित बहिणीनेही भावाच्या आयुष्यातील बदल समजून घेत त्याच्या जबाबदाऱ्यांचा आदर केला पाहिजे. नात्यातील जवळीक टिकवायची असेल तर अधिकारापेक्षा समजूतदारपणाला महत्त्व द्यावे लागते. भावंडांच्या नात्यात कधी आर्थिक मदतीची गरजही निर्माण होते. एखाद्या भावंडाला शिक्षणासाठी, व्यवसायासाठी किंवा अन्य जीवनप्रसंगी मदत लागते. अशा वेळी शक्य असेल तेव्हा मदतीचा हात पुढे करणे ही नात्याची ताकद आहे. मात्र आर्थिक व्यवहारांमुळे प्रेमाचे मोजमाप होऊ नये. कोणाने किती खर्च केला, कोणाने किती भेट दिली किंवा कोणाने किती मदत केली याची हिशेबपत्रिका नात्यात ठेवली तर भावनिक जवळीक कमी होऊ शकते. नात्याची श्रीमंती पैशांत नसते; ती विश्वासात असते. संकटाच्या वेळी तू एकटा नाहीस किंवा तू एकटी नाहीस हा दिलासा अनेकदा कोणत्याही आर्थिक मदतीपेक्षा मोठा आधार ठरतो.रक्षाबंधनाच्या निमित्ताने भावंडांनी आपल्या नात्याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. वर्षभर व्यस्त राहिल्यानंतर या दिवशी भेटणे हा एक सुंदर योग असतो; परंतु त्यापलीकडे या दिवसाचा अर्थ अधिक मोठा आहे. एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलणे, जुन्या आठवणींना उजाळा देणे, झालेल्या गैरसमजांवर पडदा टाकणे आणि भविष्यातील आयुष्यासाठी एकमेकांना प्रोत्साहन देणे हे या दिवसाचे खरे सौंदर्य ठरू शकते. राखी हा केवळ मनगटावर बांधला जाणारा धागा नसून भावनिक नात्याची आठवण करून देणारे प्रतीक आहे. त्या धाग्याला अर्थ प्राप्त होतो तो परस्परांच्या मनात असलेल्या प्रेमामुळे.

आज डिजिटल माध्यमांमुळे दूर असलेल्या भावंडांशी संपर्क साधणे सोपे झाले आहे. व्हिडिओ संभाषण, संदेश आणि दूरध्वनी यामुळे अंतर काही प्रमाणात कमी करता येते. परंतु तंत्रज्ञान हे नात्याचा पर्याय नाही; ते नाते जपण्याचे साधन आहे. सामाजिक माध्यमांवर एकमेकांसोबतचे छायाचित्र प्रसिद्ध करणे किंवा शुभेच्छा देणे सुंदर आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे प्रत्यक्ष आयुष्यात एकमेकांसाठी उपलब्ध असणे. एखाद्या भावंडाच्या यशावेळी मनापासून आनंद व्यक्त करणे आणि अपयशाच्या वेळी त्याला कमी लेखण्याऐवजी धीर देणे यामुळे नाते अधिक अर्थपूर्ण होते. सार्वजनिक प्रदर्शनापेक्षा खासगी आपुलकी अधिक मौल्यवान असते.बहिण-भावाच्या नात्यातील आठवणी हा एक वेगळाच भावनिक ठेवा असतो. घरातील जुन्या वस्तू, शाळेची छायाचित्रे, बालपणीचे खेळ, एकत्र केलेल्या सहली, पालकांनी दिलेल्या सूचना, छोट्या कारणांवरून झालेले वाद आणि नंतर झालेली मैत्री या सर्व गोष्टी काळ पुढे गेल्यानंतर अमूल्य वाटू लागतात. बालपणी ज्यांच्यासोबत वेळ घालवणे अगदी स्वाभाविक वाटत होते, त्याच क्षणांची पुढे आठवण येते. म्हणूनच भावंडांनी केवळ जुन्या आठवणी जपण्यापेक्षा नव्या आठवणीही निर्माण कराव्यात. एकत्र वेळ घालवणे, कुटुंबीयांसोबत भेटणे आणि परस्परांच्या आयुष्यात सहभागी राहणे यामुळे नाते सतत नव्याने फुलत राहते.

या नात्यात क्षमाशीलतेचे महत्त्वही मोठे आहे. भावंडे जवळची असल्यामुळे एकमेकांकडून अपेक्षाही मोठ्या असतात. त्यामुळे कधी शब्द लागतात, गैरसमज होतात किंवा मन दुखावले जाते. परंतु प्रत्येक मतभेदाला कायमचा दुरावा बनू देणे योग्य नाही. नाते टिकवण्यासाठी कधी स्वतःची चूक मान्य करावी लागते, कधी माफी मागावी लागते आणि कधी समोरच्याला माफ करावे लागते. मीच बरोबर या भूमिकेपेक्षा आपले नाते महत्त्वाचे आहे ही भावना अधिक मोठी असली पाहिजे. नात्यातील प्रेम टिकवण्यासाठी अहंकाराला थोडे मागे ठेवावे लागते.बहिण-भावाचे नाते आपल्याला माणूस म्हणून अधिक संवेदनशील बनवते. दुसऱ्याची काळजी घेणे, त्याच्या भावनांचा आदर करणे, त्याच्या आनंदात सहभागी होणे आणि संकटात त्याला आधार देणे या मूल्यांची सुरुवात अनेकदा कुटुंबातील नात्यांपासूनच होते. म्हणूनच या नात्यातील प्रेम केवळ दोन व्यक्तींमध्ये मर्यादित राहत नाही; ते संपूर्ण कुटुंबाच्या वातावरणावर परिणाम करते. परस्पर सन्मान आणि समानतेवर आधारलेली भावंडे पुढे समाजातील इतर नात्यांकडेही अधिक संवेदनशीलतेने पाहू शकतात. त्यामुळे बहिण-भावाचे नाते हे केवळ वैयक्तिक नाते नसून मानवी मूल्यांची शाळाही आहे.रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधावी, भावाने बहिणीला प्रेमाने भेट द्यावी, एकमेकांना शुभेच्छा द्याव्यात; परंतु या बाह्य कृतींपेक्षा त्या मागील भावना अधिक महत्त्वाच्या आहेत. बहिणीच्या स्वप्नांना बळ देणे, भावाच्या संघर्षांना समजून घेणे, एकमेकांच्या निर्णयांचा आदर करणे, मतभेदांमध्ये संवाद साधणे आणि गरजेच्या वेळी निःस्वार्थपणे साथ देणे हा या नात्याचा खरा उत्सव आहे. नात्याचे सौंदर्य एका दिवसापुरते मर्यादित नसते. रक्षाबंधनाचा दिवस त्या नात्याची जाणीव अधिक तीव्र करून देतो; मात्र त्यातील प्रेम वर्षभर जगले गेले पाहिजे.आजच्या काळात नात्यांमध्ये वाढणारा ताण, धावपळ आणि वैयक्तिक आयुष्याभोवती केंद्रित होत जाणारी जीवनशैली पाहता बहिण-भावाच्या नात्याची जपणूक अधिक आवश्यक आहे. भावंडे एकमेकांची स्पर्धक नसून सहप्रवासी असतात. एका भावंडाचे यश दुसऱ्याच्या अपयशाचे कारण नसते. उलट, एकमेकांच्या प्रगतीत आनंद मानणे आणि परस्परांना पुढे जाण्यास प्रोत्साहन देणे ही नात्याची खरी उंची आहे. तुलना, मत्सर आणि अहंकार यांना दूर ठेवून सहकार्य आणि आपुलकी स्वीकारली तर भावंडांचे नाते अधिक आनंददायी बनते.

शेवटी, बहिण-भावाचे नाते हे आयुष्याच्या प्रवासातील एक अनमोल सोबत आहे. बालपणी एकाच घराच्या छताखाली सुरू झालेला हा प्रवास पुढे वेगवेगळ्या दिशांनी जाऊ शकतो; परंतु मनातील आपलेपणाचा धागा तुटण्याची गरज नाही. काळ बदलतो, माणसे बदलतात, परिस्थिती बदलते आणि जबाबदाऱ्या वाढतात; तरीही बालपणीचा भाऊ आणि बालपणीची बहीण मनाच्या एका कोपऱ्यात कायम जिवंत राहतात. म्हणूनच २८ ऑगस्टच्या रक्षाबंधनानिमित्त राखीच्या धाग्यापेक्षा त्या धाग्याशी जोडलेले प्रेम अधिक महत्त्वाचे मानू या. एकमेकांच्या स्वातंत्र्याचा सन्मान, स्वप्नांना प्रोत्साहन, सुख-दुःखात साथ, मनमोकळा संवाद आणि आयुष्यभराचा विश्वास या मूल्यांनी बहिण-भावाचे नाते अधिक समृद्ध करू या. कारण शेवटी राखी मनगटावर बांधली जाते; पण तिचा खरा धागा मनामध्ये जुळलेला असतो. तो धागा प्रेमाचा, आठवणींचा आणि विश्वासाचा असतो, आणि म्हणूनच तो काळाच्या कोणत्याही अंतरापेक्षा अधिक मजबूत असतो.

# अण्णाभाऊंनी शोषित पिढीत कष्टकऱ्याची भूमिका साहित्यातून मांडली-प्रा.रामचंद्र भरांडे

भोकर/प्रतिनिधी- साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे व्यवस्थेची जाणीव करून देतात, व्यवस्था आपल्या सोयीची नाही, ही व्यवस्था माणसाला गुलाम बनवते हे सर्व ओळखून त्यांनी आपल्या साहित्यातून शोषित पिढीत कष्टकऱ्यांची भूमिका मांडली असे विचार लोकस्वराज्य आंदोलन चळवळीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे यांनी भोकर येथील जयंती सोहळ्यात बोलताना मांडले.

भोकर येथे साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती २५ ऑगस्ट रोजी साजरी करण्यात आली सकाळी ध्वजारोहणानंतर झालेल्या प्रबोधन सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे हे होते प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा. रामचंद्र भरांडे म्हणाले अण्णाभाऊंची देशाप्रती बांधिलकी होती मानवी समाजाला आकार देण्याचं काम त्यांनी केलं, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचे सूत्र दिल शिक्षण समाजाला जागे करते, अण्णाभाऊंचे साहित्य जगाचा तिसरा डोळा होता आज शिक्षण बंद होत आहे मराठी शाळा बंद होत आहेत, फुले शाहू आंबेडकर छ. शिवाजी महाराज केवळ पुतळ्यात नाहीत तर वर्तमानातल्या संघर्षात आहेत आज कर्मकांड वाढत चाललंय, कोट्यावधी रुपये जिल्ह्यामध्ये जयंतीसाठी खर्च होतात त्या खर्चामधून एखादी अभ्यासिका वाचनाची पुस्तके मुलांना मिळाली तर त्याचा फायदा अधिक होईल विचार नाचणाऱ्याच्या मनात रुजत नाहीत तर वाचणाऱ्याच्या मनात रुजतात परावलंबी माणूस समाजाचे संरक्षण करू शकत नाही, जमिनीवरील समाजाची उन्नती करण्याची गरज आहे असेही ते शेवटी म्हणाले प्रास्ताविक संपादक उत्तम बाबळे यांनी केले तर अध्यक्ष समारोप नगराध्यक्ष भगवाराव दंडवे यांनी केला. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पा. रावणगावकर यांनीही मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमास पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष बी. आर. पांचाळ, पत्रकार बाबुराव पाटील, राजेश वाघमारे, युसुफ शेख, गटनेते विठ्ठल पा. धोंडगे नगरसेवक डॉ. बालाजी बिल्लवार, डॉ. मनोज गीमेकर, श्रीकांत दरबस्तवार, अविनाश वाघमारे,गणेश यशवंतकर, दिनेश लक्षटवार, अप्पाराव राठोड, संतोष आलेवाड, आदींची उपस्थिती होती जयंती मंडळाचे अध्यक्ष विकास वाघमारे, अनिल डोईफोडे, दिलीप वाघमारे, केरबा देवकांबळे, महेंद्र किनीकर, संजय बरकमकर,बाळासाहेब टिकेकर, सखाराम मोरे, सखाराम वाघमारे आदी सह जयंती मंडळाने परिश्रम घेतले सभेनंतर शहरातून भव्य मिरवणूक करण्यात आली, सुप्रसिद्ध गायिका राधा खुडे यांच्या गीत गायनाचा बहारदार कार्यक्रम झाला.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ३० रोजी नांदेड दौरा

नांदेड/प्रतिनिधी-राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवार, दि.३० ऑगस्ट रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहणार आहे.



रविवार, दि.३० ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता मुंबई विमानतळ येथून विमानाने नांदेड विमानतळाकडे प्रयाण करतील. दुपारी १२.१५ वाजता नांदेड विमानतळ येथे आगमन झाल्यानंतर हेलिकॉप्टरने परभणीकडे प्रयाण करतील.दुपारी ३.१५ वाजता पोलीस परेड मैदान, हेलिपॅड, परभणी येथून हेलिकॉप्टरने नांदेड विमानतळाकडे प्रयाण करतील. दुपारी २.४५ वाजता नांदेड विमानतळ येथे आगमन झाल्यानंतर शासकीय विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

# नगिना घाट स्मशानभूमीची दुरवस्था

## आमदार निधीतून विकासकामे करण्याची स.जगदीपसिंघ नंबरदार यांची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-ऐतिहासिक नगिना घाट स्मशानभूमीची मोठी दुरवस्था झाली असून, आवश्यक नागरी सुविधांचा अभाव असल्याने अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. महापालिका प्रशासन स्मशानभूमी परिसरातील विकासासाठी दुर्लक्ष करीत आहे. या स्मशानभूमीची आमदार निधीतून तातडीने दुरुस्ती व विकासकामे करावीत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते स. जगदीप सिंघ मोहन सिंघ नंबरदार यांनी आ.आनंदराव बोढारकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नगिना घाट स्मशानभूमीचा परिसर शीख समाजासह परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा असून, येथे नियमितपणे अंत्यसंस्कार केले जातात. मात्र, सध्याच्या स्थितीत मूलभूत सुविधांची कमतरता असल्याने अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिक गंभीर होत असून, पाऊस आणि प्रतिकूल हवामानात अंत्यविधीसाठी आलेल्या नागरिकांना पुरेशा निवाऱ्याअभावी त्रास सहन करावा लागत आहे. महापालिका प्रशासन स्मशानभूमी परिसरात मुलभूत सुविधा व विकास कामे करण्यासाठी दुर्लक्ष करीत आहे. स्मशानभूमीत सध्या केवळ सुमारे ३० बाय ८० फूट आकाराचे छत असून, नागरिकांना थांबण्यासाठी स्वतंत्र व पुरेसे टिनशेड उपलब्ध नाही. अंत्यविधीसाठी आवश्यक लोखंडी पिंजरेही उपलब्ध नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच पिण्याच्या व वापराच्या पाण्याची व्यवस्था नसून, रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशयोजनाही नाही. स्वच्छतागृह व स्नानगृहाची सुविधा नसल्याने महिला, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वच नागरिकांची गैरसोय होत आहे. या स्मशानभूमीची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती, शेड, पाणी, वीज, लोखंडी पिंजरे तसेच स्वच्छतागृह व स्नानगृहाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नंबरदार यांनी केली आहे. लोकप्रतिनिधी म्हणून



आ.आनंदराव बोढारकर यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन आमदार निधीतून आवश्यक निधी मंजूर करावा आणि नागिना घाट स्मशानभूमीचा कायापालट करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# कर्जमुक्तीच्या दुसऱ्या टप्प्यात जिल्ह्यातील ५१ हजार ३३० शेतकऱ्यांना कर्जमाफी


नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यात कर्जमाफीच्या दुसऱ्या टप्प्यात ५१ हजार ३३० शेतकऱ्यांसाठी ३८१ कोटी ९४ लाख ६७ हजार ३८ रुपये इतकी कर्जमाफीची रक्कम प्राप्त झाली आहे. ही रक्कम जिल्ह्यातील संबंधित बँकांमध्ये वर्ग करण्यात आली असून, लाभार्थी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर रक्कम वर्ग करण्याची कार्यवाही संबंधित बँकांकडून सुरू आहे.

यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १ हजार ५३५ कर्जदार शेतकऱ्यांसाठी ११ कोटी ३६ लाख ९ हजार ७३१ रुपये इतकी रक्कम प्राप्त झाली असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांनी दिली आहे.यापूर्वी योजनेच्या पहिल्या टप्प्यात नांदेड जिल्ह्यातील १२ हजार ९२९ पात्र शेतकऱ्यांसाठी १०६ कोटी २४ लाख ९८ हजार २३१ रुपये इतकी रक्कम बँक खात्यात वर्ग करण्यात आली असून, सदर रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर वर्ग करण्यात आली आहे. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना नवीन कर्ज घेण्यास पात्रता प्राप्त होते.दरम्यान, दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्ह्यातील ७३ हजार ६६६ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. अद्याप २३ हजार १०६ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केलेले नाही. यापैकी १२ हजार २५७ शेतकऱ्यांकडे अद्याप ग्रीस्टॅक आयडी उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे आधार प्रमाणीकरण होऊ शकलेले नाही.ज्या शेतकऱ्यांकडे ग्रीस्टॅक आयडी नाही, त्यांनी तात्काळ ग्रीस्टॅक आयडी काढून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. तसेच ज्या शेतकऱ्यांनी अद्याप आधार प्रमाणीकरण केलेले नाही, त्यांनी विलंब न करता प्रमाणीकरण पूर्ण करून शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# भोकरमध्ये शिवसेनेची महत्त्वपूर्ण आढावा बैठक

भोकर/प्रतिनिधी-शिवसेना शिंदे गटाची महत्त्वपूर्ण बैठक भोकर येथील विश्रामगृहावर जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील यांच्या उपस्थितीत २६ ऑगस्ट रोजी घेण्यात आली.

या बैठकीत पक्ष बांधणी पक्षप्रवेश केलेल्या नवीन कार्यकर्त्यांचा सत्कार पुढील राजकीय हालचाली याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ॲड. शेखर कुंटे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करून त्यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीसाठी भोकर विधानसभा शिवसेनेचे इंजि.



विश्वंभर पवार, युवा सेना जिल्हाप्रमुख विकास देशमुख, जिल्हाप्रमुख रवीभाऊ थोरात, अर्धापूरचे तालुकाप्रमुख संतोष पा. कपाटे, भोकर तालुकाप्रमुख माधव पा. वडगावकर, नारायण पा. सोळंके, प्रदीप दौलतदार, युवा सेना तालुकाप्रमुख दर्शन पा. डुरे, माधव करेवाड, दीपक मेटकर, सचिन पा. किन्हाळकर, सचिन सूनकळेकर, सोहम शेटे यांच्यासह तालुक्यातील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वसीम बाबू सेठ परिवाराकडून रक्तदान शिबिर संपन्न

नांदेड/प्रतिनिधी- ईद-ए- मिलादुन्नबीच्या पावन पर्वाच्या औचित्याने शहरातील रेल्वे स्थानक रस्त्यावर असलेल्या मोहम्मद यूनुस मशीद येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन वसीम बाबू सेठ यांच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले.



या शिबिरासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरीच्या रक्तपेढी विभागाच्या डॉक्टरांची टीम संपूर्ण उपकरणांसह मशिदीत दाखल झाली होती. दुपारी ३ ते रात्री ९ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून हे शिबिर यशस्वी केले. यावेळी मशिदीचे प्रमुख ॲड. मोहम्मद कासिम उर्फ वसीम बाबू सेठ त्यांचे कुटुंबीय, त्यांचे मित्र परिवार तसेच समाजातील सर्व स्तरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या उपक्रमात सहभाग घेतला होता. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल शासकीय रक्तपेढीच्या वतीने मोहम्मद यूनुस मशीद कमिटीचे मोहम्मद कासिम उर्फ वसीम बाबू सेठ तसेच हॅप्पी क्लबचे शोएब भाई यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. मोहम्मद कासिम उर्फ वसीम बाबू सेठ हे सामाजिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, रामनवमी यांसारख्या सर्व धर्मीय जयंती व सणांच्या वेळी त्यांच्या परिवाराकडून आणि मित्र परिवाराकडून पाणी व शरबत वाटप, तसेच इतर सामाजिक उपक्रम राबविले जातात.

# खरेदी विक्री संघाच्या संचालकपदी दत्तात्रय पाटील बेटमोगरेकर यांची बिनविरोध निवड

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालकपदी बेटमोगरा गटाचे सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन दत्तात्रय रामचंद्र पाटील बेटमोगरेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.माजी आ.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर गटाच्या एका संचालकाची बिनविरोध निवड झाल्यामुळे आगामी काळात या निवडणुकीत चुरस निर्माण होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

मुखेड तालुका खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीसाठी आ. डॉ. तुषार राठोड व माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी आपल्या समर्थकांचे उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. बेटमोगरेकर गटाकडून बेटमोगरा गटाची सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन दत्तात्रय रामचंद्र पाटील बेटमोगरेकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून हंगरगा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन भीमराव दस्तुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता पण त्यांचा अर्ज अवैद्य ठरविण्यात आला, त्यामुळे दत्तात्रय पाटील बेटमोगरेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. श्री दत्तात्रय पाटील बेटमोगरेकर यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल बेटमोगरेकर समर्थकांनी जल्लोष केला आहे.

CHANGE IN NAME

My old name is **AYESHA KHANAM ATAULLAH KHAN** which now I am changing as new name **AYESHA KHANAM** Hence forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Contact
**AYESHA KHANAM**
Hovse No.1-10-11
Jangamwadi Road, Khan confectionary,
Nizam colony Taroda BK
Nanded 431605
MAHARASHTRA,INDIA

## जाहीर प्रगटन

श्री.के.एस.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, उमरी यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक.५४/२०२६
बालाजी व इतर वि.निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : १. बालाजी होनाजी खतगाये,वय ५२ वर्षे, धंदा - मजुरी, २.राजनंदनी पि.बालाजी खतगाये,वय २१ वर्षे,व्यवसाय-घरकाम, ३.श्रीप्रसाद बालाजी खतगाये,वय १३ वर्षे,व्यवसाय-शिक्षण, अ.पा.क. बालाजी होनाजी खतगाये सर्व रा.शेलगाव ता.उमरी जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

मयत सुनिता बालाजी खतगाये यांचे दिनांक २२/०५/२०२६ रोजी मौजे शेलगाव ता.उमरी जि.नांदेड येथे निधन झाले.

सदरिल जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार १. बालाजी होनाजी खतगाये वय ५२ वर्षे, धंदा-मजुरी, रा.शेलगाव ता. उमरी जि.नांदेड व इतर २ हे मयताचे वारस असून त्यांचे व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत सुनिता बालाजी खतगाये, यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील श्री बी.जी.सवई यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरिल प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की, प्रस्तुत प्रकरणात वरिल बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणने सदरिल जाहिर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक १९/०९/२०२६ पर्यंत विहीत मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

स्वाक्षरित/-
**वरिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
उमरी जि.नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
उमरी जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३०५/२०२६
(CNR No.MHND10-001054-2026)

अर्जदार :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सुशिला रामचंद्र केंद्रे<br>रा.फकिरदरवाडी ता.कंधार जि.नांदेड | वय-७५ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | शांताबाई भ्र.बालाजी गित्ते<br>रा.घुगेवाडी ता.लोहा जि.नांदेड | वय-४६ वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | कैलास पि.रामचंद्र केंद्रे<br>रा.फकिरदरवाडी ता.कंधार जि.नांदेड | वय-३७ वर्षे | धंदा-शेती |
| ४ | निताबाई भ्र.धनराज मुंडे<br>रा.दिग्रस (बु.) ता.कंधार जि.नांदेड | वय-३४ वर्षे | धंदा-घरकाम |
| ५ | धनेश्री भ्र.विठ्ठल घुगे<br>हरबळ (प.क.) ता.कंधार जि.नांदेड | वय-३२ वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध गैरअर्जदार -

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडिल नामे रामचंद्र नारायण केंद्रे हे होते ते दिनांक १०/०८/२०२५ फकिरदरावाडी ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की रामचंद्र नारायण केंद्रे यांचे अर्जदारा शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत रामचंद्र नारायण केंद्रे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत रामचंद्र नारायण केंद्रे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - २९/०९/२०२६

आज रोजी दि.१८/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३०३/२०२६
(CNR No.MHND10-001052-2026)

अर्जदार :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बळीराम पि.माधवराव नेरले<br>रा.संगूचीवाडी ता.कंधार जि.नांदेड | वय-४२ वर्षे | धंदा-शेती |
| २ | सुनंदा भ्र.प्रल्हाद वारकड<br>रा.संगूचीवाडी ता.कंधार जि.नांदेड | वय-५० वर्षे | धंदा-मजुरी |
| ३ | अनिता भ्र.सूर्यकांत बारोळे<br>रा.किरोडा ता.लोहा जि.नांदेड | वय-३३ वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध गैरअर्जदार -

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील माधव नरसिंगा नेरले हे होते ते दिनांक १०/०३/२०२२ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ हे आपसात सख्खे भाउ बहिण आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की माधव नरसिंग नेरले यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत माधव नरसिंगा नेरले यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत माधव नरसिंगा नेरले यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - २४/०९/२०२६

आज रोजी दि.१९/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

# दिशा सालियन प्रकरणाचा निकाल राखीव

## हायकोर्टात सुनावणी पूर्ण;आदित्य ठाकरेंकडून राणेंवर आरोप

मुंबई/प्रतिनिधी-दिवंगत सेलिब्रिटी व्यवस्थापक दिशा सालियन यांच्या मृत्यूप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात सुरू असलेल्या याचिकेवरील सुनावणी शुक्रवारी पूर्ण झाली. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने याप्रकरणी निकाल राखून ठेवला आहे. त्यामुळे न्यायालयाच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दिशा सालियन यांच्यावर बलात्कार करून त्यांची हत्या करण्यात आल्याचा गुन्हा दाखल करून नव्याने तपास करावा, अशी मागणी त्यांचे वडील सतीश सालियन यांनी याचिकेतून केली आहे. गुरुवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने मुंबई पोलिसांच्या आतापर्यंतच्या तपासावर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. तसेच आवश्यक वाटल्यास अद्यापही गुन्हा दाखल करून तपास करता येऊ शकतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते.शुक्रवारी सरकारी वकील शिशिर हिरे यांनी युक्तिवाद करताना याचिका फेटाळण्याची मागणी केली. वैद्यकीय अहवालात लैंगिक अत्याचार झाल्याचे कोणतेही पुरावे आढळले नाहीत. डॉक्टरांच्या तपासणीतही तशी बाब समोर आली नसल्याचे त्यांनी न्यायालयाला सांगितले. आरोप-प्रत्यारोप होत असल्याने तपास दीर्घकाळ सुरू ठेवण्यात आला. दिशा नैराश्यात होती आणि त्यातूनच तिने आत्महत्या केल्याचे तिच्यासोबत राहणाऱ्या रोहित रॉयच्या जबाबातून समोर आल्याचा दावा सरकारी वकिलांनी केला.यावेळी न्यायालयाने दिशाला इमारतीवरून खाली पडल्यानंतर झालेल्या दुखापतींबाबतही प्रश्न उपस्थित केला. त्यावर दिशाचे दात फ्रॅक्चर झाले होते, अशी माहिती सरकारी वकिलांनी दिली. प्रत्येक व्यक्ती खाली पडल्यानंतर होणाऱ्या दुखापती वेगवेगळ्या असू शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.सरकारी वकिलांनी सतीश सालियन यांच्या यापूर्वीच्या जबाबांचाही संदर्भ दिला. १५ जानेवारी २०२४ रोजी दिलेल्या जबाबात मुलीची एक व्यावसायिक डील रद्द झाल्याने आर्थिक नुकसान झाले आणि त्यातून तिने आत्महत्या केली असावी, असे वडिलांनी म्हटल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. आतापर्यंत पाच वेळा त्यांचा जबाब नोंदवण्यात आल्याचेही सरकारी वकिलांनी नमूद केले.दरम्यान, आदित्य ठाकरे यांचे वरिष्ठ वकील सुदीप पासबोला यांनी याचिका राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा केला. राजकीय प्रतिस्पर्ध्यांनी ही याचिका दाखल करण्यामागे भूमिका बजावल्याचे सांगताना त्यांनी राणे कुटुंबीयांसह राष्ट्रीय माध्यमातील व्यक्तीचा उल्लेख केला. मात्र, दिशाच्या वडिलांबद्दल पूर्ण सहानुभूती असून त्यांच्या मुलीच्या मृत्यूवरून सुरू असलेले राजकारण थांबले पाहिजे, असे त्यांनी न्यायालयात म्हटले. दिशाच्या मृत्यूच्या तपासाबाबत न्यायालयाने यापूर्वी व्यक्त केलेल्या निरीक्षणांमुळे या प्रकरणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आता न्यायालयाच्या निकालातून याप्रकरणी पुढील तपासाचे आदेश दिले जातात की याचिका फेटाळली जाते, याकडे राजकीय आणि सामाजिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# पवित्र पोर्टलच्या शिक्षक भरतीची गुणवत्ता यादी जाहीर

## १३ हजार पैकी सुमारे ८ हजार महिला

पुणे:राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक भरतीसाठी राबविण्यात येणाऱ्या पवित्र प्रणालीतील मुलाखतीशिवाय प्रकाराच्या गुणवत्ता यादीत महिलांनी बाजी मारली आहे. या प्रक्रियेत राज्यभरातून १३ हजार ११९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली असून, त्यात ७ हजार ९३४ महिला आणि ५ हजार १८५ पुरुष उमेदवारांचा समावेश आहे. त्यामुळे महिलांची संख्या पुरुषांपेक्षा तब्बल २ हजार ७४९ ने अधिक आहे.

राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेतील पवित्र पोर्टलमधून मुलाखतीशिवाय प्रकारातील गुणवत्ता यादी गुरुवारी प्रसिद्ध करण्यात आली. पवित्र प्रणालीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक पदांची भरती केली जात आहे. उपलब्ध पदे आणि उमेदवारांची गुणवत्ता यानुसार ही शिफारस करण्यात आली आहे. राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

# मुंबईतील ओबीसी एल्गार महामोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

नांदेड/प्रतिनिधी-ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांसाठी ओबीसी महारक्षक प्रा. लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली १ सप्टेंबर रोजी मुंबईत मंत्रालयावर काढण्यात येणाऱ्या ओबीसी एल्गार महामोर्चात महाराष्ट्रातील ओबीसी बांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड यांनी केले.

ओबीसी समाजाच्या हक्कांचे संरक्षण आणि आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हा महामोर्चा काढण्यात येत असल्याचे आयलवाड यांनी सांगितले. हैदराबाद गॅझेट रद्द करावे, त्याअंतर्गत देण्यात आलेली मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रे व जातवैधता प्रमाणपत्रे रद्द करावीत, तसेच न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती रद्द करावी, अशा प्रमुख मागण्या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत.ओबीसी विद्यार्थ्यांचे २७ टक्के शैक्षणिक आरक्षण कायम ठेवावे, महागाई निर्देशांकानुसार शिष्यवृत्ती द्यावी आणि प्रत्येक तालुकास्तरावर सर्व सुविधायुक्त वसतिगृहे सुरू करावीत, अशीही मागणी करण्यात आली आहे. ओबीसी सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी २७ टक्के आरक्षणाच्या प्रमाणात शासकीय व निमशासकीय नोकरभरती सुरू करावी, अशी मागणीही करण्यात येणार आहे.

# व्हीपीके उद्योग समुहाचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट

## सहकार,उद्योग क्षेत्रासंबंधी सविस्तर चर्चा





उमरी/प्रतिनिधी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लोककल्याणकारी शेतकरी नेते व्हीपीके उद्योग समूहाचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी नांदेड जिल्ह्यातील शेतकरी, युवक, रोजगार निर्मिती, उद्योग आणि सहकार क्षेत्राशी संबंधित विविध विषयांवर दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी कवळे गुरुजी यांची आपुलकीने विचारपूस करत नांदेड जिल्ह्यात सुरू असलेल्या त्यांच्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, उद्योग-व्यवसायाला चालना देणे तसेच शेतकरी व ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासासाठी सुरू असलेल्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. राज्यसभा खा.अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नायगावचे आ.राजेश पवार यांच्या सहकार्याने शेतकरी, युवक आणि ग्रामीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा मिळाव्यात आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे कवळे गुरुजी यांनी सांगितले. उद्योग व शेतकरी क्षेत्रातील विविध मागण्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करण्यात आली. त्यातील काही मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. दरम्यान, भारतीय जनता पक्षाशी संबंधित सामाजिक, शेतकरी व रोजगाराभिमुख कार्याची दखल घेत भविष्यात पक्षाकडून कवळे गुरुजी यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक संकेत दिल्याचे सांगण्यात आले.

# गोकुळधाम इंटरनॅशनल स्कूलमध्ये अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे




नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथील गोकुळधाम इंटरनॅशनल स्कूलमध्ये रक्षाबंधनाचा सण एका अनोख्या व प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यात आला. समाजाच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असलेल्या पोलीस दलाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांनी नांदेड गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयाड यांना राखी बांधली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पोलीस आपल्या आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी कशाप्रकारे कार्य करतात, याबाबत जाणीव निर्माण करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता, आदर आणि जबाबदार नागरिकत्वाची मूल्ये रुजविण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयाड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपले विचार व्यक्त केले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्तप्रिय, जबाबदार आणि देशाचे सुजाण नागरिक बनण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमास शाळेच्या डायरेक्टर प्रिन्सिपल श्रीमती रमिंदर कौर मोदी, व्यवस्थापन समितीचे सदस्य कैलास शिंदे व सुरेश जाधव, तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. रक्षाबंधनाच्या या अनोख्या उपक्रमातून संरक्षण, विश्वास, कृतज्ञता आणि सामाजिक जबाबदारीचा सुंदर संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

# मुखेड शहरात मच्छर प्रतिबंधक फवारणीला सुरुवात

मुखेड/प्रतिनिधी-पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढून विविध आजारांचा फैलाव होऊ नये, यासाठी मुखेड नगरपरिषद प्रशासनाने मच्छर प्रतिबंधक फवारणी मोहीम हाती घेतली आहे. नागरिकांचे आरोग्य अबाधित राहावे, यासाठी शहरातील विविध प्रभागांमध्ये टप्प्याटप्प्याने फवारणी करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

नगर परिषदेच्या नगराध्यक्ष सौ. विजया धोंडूराम देबडवार व माजी नगराध्यक्ष गंगाधर राठोड यांच्या आदेशानुसार आणि सर्व नगरसेवकांच्या नेतृत्वाखाली या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. प्रभाग क्रमांक १ मधून मच्छर प्रतिबंधक फवारणीचा शुभारंभ करण्यात आला.पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी साचल्याने डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता वाढते. परिणामी डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन नगरपरिषदेकडून प्रभागनिहाय फवारणी करून डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.यावेळी नगरसेवक मैनोद्दीन शेख, गणेश पाटील बेळीकर, दीपक लोहबंदे, संजय सूर्यवंशी, ज्ञानेश्वर यलुलवाड, देवा कुंटेवाड यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.नगरपरिषद प्रशासनाने सुरू केलेल्या या आरोग्यविषयक उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून, शहरातील इतर प्रभागांमध्येही नियमितपणे मच्छर प्रतिबंधक फवारणी करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# परिक्रमा संपविताना रानडुकराचा भाविकावर हल्ला!



माहूर/प्रतिनिधी-माहूर गडावरील नारळी पौर्णिमा परिक्रमा यात्रेसाठी आलेल्या भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. परिक्रमा पूर्ण करून श्री अनुसया माता मंदिराकडे जात असताना रस्त्याच्या कडेला लघुशंकेसाठी थांबलेल्या भाविकावर जंगलातून आलेल्या भल्या मोठ्या रानडुकराने अचानक धडक दिल्याची थरारक घटना शुक्रवार, दि.२८ रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास घडली. या हल्ल्यात भाविकाच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली असून, माहूर ग्रामीण रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

वाशिम जिल्ह्यातील मौजे वारला येथील रामदास कोंडबा आसोले (वय ३८) हे मित्र व नातेवाईकांसह परिक्रमा यात्रेसाठी दि.२७ रोजी दुपारी बाराच्या सुमारास माहूर गडावर दाखल झाले होते. सायंकाळी दर्शन घेतल्यानंतर त्यांनी परिक्रमा सुरू केली. रात्रभर परिक्रमा पूर्ण केल्यानंतर शुक्रवारी सकाळी साडेआठच्या सुमारास ते श्री अनुसया माता मंदिराकडे समाप्तीसाठी जात होते.याचदरम्यान लघुशंका आल्याने आसोले हे रस्त्याच्या बाजूला थांबले. ते लघुशंका करत असतानाच जंगलातून अचानक एक भलेमोठे रानडुक्कर बाहेर आले आणि त्यांच्या मागून जोरदार धडक दिली. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे आसोले खाली कोसळले. रानडुकराच्या धडकेत त्यांच्या डाव्या पायाच्या मांडीच्या मागील बाजूस मोठी जखम झाली. वेदनेने त्यांनी आरडाओरड सुरू केली. आवाज ऐकताच रानडुक्कर जंगलाच्या दिशेने पळून गेले.आसोले यांचा आक्रोश ऐकून सोबत असलेले मित्र व नातेवाईक घटनास्थळी धावून आले. त्यावेळी ते रक्तबंबाळ अवस्थेत विव्हळत पडलेले दिसले. सहकाऱ्यांनी तातडीने उपलब्ध वाहनातून त्यांना माहूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. अक्षय सांगळे यांनी जखमेवर सात ते आठ टाके घालून प्राथमिक उपचार केले. प्रकृती लक्षात घेता पुढील उपचारासाठी त्यांना वाशिम येथे पाठविण्यात आले आहे., घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन जखमी भाविकाची विचारपूस केली तसेच घटनेची नोंद घेतली.

पान १ वरुन

## मनोज जरांगे पाटील यांचे...

समाजाच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप केला. मराठ्यांचे वाटोळे करू नका. मराठा तरुणांच्या तळतळाटाचा विचार करा, असे ते म्हणाले. मात्र, एकाही मराठा तरुणाने आत्महत्या करू नये, असे आवाहनही त्यांनी केले. या आंदोलनात ५८ लाख मराठा-कुणबी नोंदींच्या प्रमाणपत्रांना वैधता द्यावी.,सातारा, कोल्हापूर आणि औंध पुणे गॅझेटचा शासन निर्णय काढावा., बलिदान गेलेल्या कुटुंबातील पात्र सदस्यांना नोकरी द्यावी., स्वतंत्र मराठा-कुणबी मंत्रालय स्थापन करावे., सारथीच्या बंद केलेल्या योजना पुन्हा सुरू कराव्यात., अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या व्याजाचे परतावे द्यावेत., मराठवाड्यात रद्द करण्यात आलेली चार जात प्रमाणपत्रे वैध करावीत. या मागण्यांसाठी उद्यापासून सुरू होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अंतरवाली सराटीत मराठा समाजाची गर्दी होण्याची शक्यता असून, सरकार या आंदोलनाला कसा प्रतिसाद देते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## चीनमध्ये भूकंप तर नेपाळला...

माहिती दिली. कठीण भौगोलिक परिस्थिती आणि खराब हवामानामुळे बचाव कार्यात अडथळे येत असले तरी नेपाळचे लष्कर आणि हेलिकॉप्टर पथके पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.बचाव आणि मदतकार्यासाठी नेपाळ लष्कराची दोन हेलिकॉप्टर्स तसेच खासगी क्षेत्रातील हेलिकॉप्टर्सही तैनात करण्यात आली आहेत. केंद्र, प्रांतीय आणि स्थानिक प्रशासन समन्वयाने काम करीत असून, उपलब्ध सर्व संसाधनांचा वापर बचाव कार्यासाठी केला जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. परिस्थितीवर प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांचे बारकाईने लक्ष असून, नागरिकांना सतत सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## गोकुंदा विश्रामगृह प्रकरण...

### आदिवासी विकास परिषद धावली पिडीतेच्या मदतीला

२० व २१ ऑगस्ट २०२६ रोजीच्या घटनेनंतर किनवट पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार देऊनही गुन्हा नोंदवला नाही. २२ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल करण्यास इतका विलंब का? यामागील कारणांची सखोल चौकशी करावी. कर्तव्यात गंभीर कसूर केल्याप्रकरणी पोलीस निरीक्षकांना सहआरोपी करून तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे नांदेड जिल्हाध्यक्ष प्रा.विजय खुपसे, प्रदेश सचिव शेषराव कोबे, मराठवाडा उपाध्यक्ष डॉ. प्रा. किशन मिराशे, आणि कार्यकारिणी सदस्य जितेंद्र कुलसंगे यांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकास मंत्री अशोक उईक, अनु.जाती कल्याण समितीचे अध्यक्ष आ.दौलत दरोडा, राज्याचे प्रधान सचिव, गृह विभाग, आदिवासी विकास विभाग, जिल्हाधिकारी, पोलीस महानिरीक्षक, अप्पर जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, उपविभागीय कार्यालय, किनवट, उपविभागीय पोलीस अधिकारी किनवट यांना कारवाई संदर्भात निवेदन पाठविण्यात आले आहे.

# मंदिराच्या दानपेटीतील रक्कम जि.प.हायस्कूलच्या विकासासाठी सुपूर्द

देगलूर/प्रतिनिधी-गावातील मंदिरात श्रद्धेने जमा होणारी दानाची रक्कम केवळ धार्मिक कार्यापुरती मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी वापरण्याचा आदर्श हणेगाव ग्रामस्थांनी घालून दिला आहे. भवानी माता मंदिराच्या दानपेटीत वर्षभरात जमा झालेली रक्कम हणेगाव जिल्हा परिषद हायस्कूलच्या विकासासाठी देण्यात आली. श्रद्धेसोबत शिक्षणाला प्राधान्य देणारा हा उपक्रम निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

हणेगाव जिल्हा परिषद हायस्कूलच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती, आजी-माजी विद्यार्थी आणि नागरिकांच्या सहभागातून विविध विकासकामे हाती घेण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, शैक्षणिक व भौतिक सुविधा, क्रीडांगणाची दुरुस्ती तसेच आवश्यक सोयी उपलब्ध करून देण्यासाठी लोकसहभागातून निधी उभारला जात आहे. याच सामाजिक भावनेतून भवानी माता मंदिराच्या पुजारी पद्मिनबाई मारुती नाईकवाडे यांनी दानपेटीत वर्षभरात जमा झालेली रक्कम शाळेच्या विकासासाठी देण्याचा निर्णय घेतला. मंदिरातील दान विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपयोगी पडावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. शाळा ही केवळ सरकारची जबाबदारी नसून संपूर्ण गावाची जबाबदारी आहे. ज्या शाळेने गावातील अनेक पिढ्यांना घडविले, तिच्या विकासासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या परीने योगदान देणे गरजेचे आहे. यावेळी मुख्याध्यापक गाडचिलवार, समिती अध्यक्ष सुभाष नाईकवाडे, होडगे सावकार, राजू हांदीखिरे, सहशिक्षक दिलीप वाडियार, प्रल्हाद नाईकवाडे, लाईनमन बालाजी स्वामी, संदीप भाये, श्रीकांत घोडेकर, राजू माळगे यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४